मार्गदर्शन

# अशी तयार करा भाजीपाला रोपवाटिका





**योगेश मेहेत्रे**
(मो. ७३५०४०७२५४)
**प्रसाद क्षीरसागर**
सहायक प्राध्यापक,
क.का. वाघ उद्यानविद्या
महाविद्यालय, नाशिक

**भा**जीपाल्याच्या पिकांपैकी पालेभाज्या, गाजर, मुळा, भेंडी, घेवडा यांची बी कायम जागी लावून लागवड करतात, तर टोमॅटो, मिरची, कोबी, फ्लॉवर, कांदा यासारख्या भाजीपाला पिकांची प्रथम रोपे तयार करून नंतर कायम जागी लावतात. रोपे तयार करण्याचे सुद्धा एक खास तंत्र आहे. भाजीपाला पिके ही हंगामी स्वरुपाची असतात. अनेक रोग व किडींना ते लागवडीपासून ते पीक काढणीपर्यंत बळी पडत असतात. रोपवाटिकेची योग्य काळजी न घेतल्यास रोपे कमकुवत आणि रोगट होतात. अशा रोपांमुळे उत्पादनात घट होते आणि खर्चही वाढतो. रोपवाटिकेमध्ये रोपे तयार केल्यामुळे अनेक फायदे होतात. रोपांची रोपवाटिकेमध्ये स्वतंत्रपणे चांगली निगा ठेवता येते तसेच जागेची व बियांची बचत होते. शेताची पूर्वमशागत करण्यास पुरेसा वेळ मिळतो. सुरक्षित जागी रोपे लावलेली असल्यामुळे पिकांची लागवड करणे शक्य होते. कोवळ्या रोपांच्या वाढीला अत्यंत पोषक अशा सर्व गोष्टी रोपवाटिकेत उपलब्ध करून देता येणे शक्य आहे.

**रोपे अशी तयार करा :** रोपवाटिकेकरता हरळी, लव्हाळा किंवा इतर तण असलेली जमीन वापरू नये. योग्य जमीन निवडल्यानंतर त्यात गुंठ्याला १ गाडी चांगले कुजलेले शेणखत टाकावे. २० ते २५ सें.मी. खोलीपर्यंत नांगरणी करून २-३ कुळवाच्या पाळ्या देऊन जमीन भुसभुशीत करावी. जमीन भुसभुशीत केल्यानंतर ३ मी. लांब, १ मी. रुंद व १५ ते २० सें.मी. उंच आकाराचे गादी वाफे तयार करावेत. प्रत्येक गादी वाफ्यात १०० ग्रॅम सिंगल सुपरफॉस्फेट व ५० ग्रम कॉपर ऑक्सिक्लोराईड वरच्या थरात चांगले मिसळावे.

भाजीपाल्याचे शुद्ध आणि जातिवंत बी वापरणे उत्पादन वाढण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. बियाणे चांगले नसेल तर भाजीपाल्याच्या लागवडीत इतर बाबींवर केलेला सर्व खर्च वाया जाण्याची शक्यता असते. संकरित बियाण्याचे दर जास्त असल्याने बी टाकताना चांगली काळजी घ्यावी. वाफ्याच्या रुंदीच्या समांतर दीड सें.मी. खोलीच्या हलक्या हाताने रेघा पडून त्यात बी पातळ पेरावे व हळुवार मातीने झाकावे. दोन ओळीतले अंतर ६ सें.मी. ठेवावे. उन्हाळी हंगामात जमिनीचा वरचा थर कडक होऊ नये म्हणून तसेच हिवाळ्यात आर्द्रतेत वाढ करण्यासाठी वाफ्यावर पाचट, भात, गहू पिकाचे तूस हलके पसरावे व १० ते २० टक्के मोड दिसण्यास लागल्यावर काढावे. बियांच्या पेरणीनंतर गादी वाफ्यांना झारीने पाणी द्यावे. बियांची उगवण होईपर्यंत आवश्यकतेनुसार सकाळी व सायंकाळी झारीने पाणी द्यावे. बियांची लागण झाल्यापासून बी रुजणे, मोड येणे आणि पाने येणे या क्रिया अनुकूल वातावरण असताना पिकानुसार ६ ते ८ दिवसांत होतात.

**रोपांची काळजी :** भाजीपाला पिकास जुलै महिन्यात साधारणपणे चांगले बाजारभाव मिळतात. त्याकरिता रोपे एप्रिल किंवा मे महिन्याच्या पहिल्या पंधरवड्यात तयार करणे आवश्यक असते. या दोन्ही महिन्यांत तापमान ३५ अंश सेल्सिअसपेक्षा जास्त असते. अशा वेळेस ७५ टक्के नायलॉन नेट किंवा पांढरे कापड बांबूच्या सहाय्याने किंवा लोखंडी गज वापरून गादी वाफ्यावर दोन मी. उंचीपर्यंत ठेवून पिंजरा तयार करावा. यामध्ये रोपांची वाढ चांगली होते. तसेच याच्या वापरामुळे रोपांचे फुलकिडे, पांढरी माशी यासारख्या किडींपासून संरक्षण होते व विषाणूजन्य रोगाचा प्रसार होत नाही. साधारणपणे रोपे ३-४ पानांवर असताना दोन ओळीतले तण हाताने काढावे. रोपे ३-४ पानावर असताना संपूर्णा, सुफला इ. मिश्रखते प्रतिवाफ्यास २० ते २५ ग्रॅम दोन ओळींमध्ये काकरी पडून द्यावी. रोपवाटिकेत मर रोग आढळल्यास कॉपर ऑक्सिक्लोराईडची रोपांना आळवणी करावी. फुलकिडे, तुडतुडे या कीटकांमुळे विषाणुजन्य रोगांचा प्रसार होतो. कीड रोगापासून रोपांचे संरक्षण होण्यासाठी १० लि. पाण्यात १२ ते १४ मि.लि. मोनोक्रोटोफॉस २५ ते ३० ग्रॅम, डायथेन एम-४५ या मिश्रणाचा उगवण झाल्यानंतर दर १० दिवसांच्या अंतराने २ ते ३ फवारण्या कराव्यात.

**रोपे लागवडीपूर्वी :** हंगामानुसार व भाजीपाला पिकानुसार रोपे ४ ते ६ आठवड्यात लागवडीयोग्य होतात. रोपे स्थलांतर करण्यापूर्वी एक आठवडा आधीपासून पाण्याची मात्रा हळूहळू कमी करावी म्हणजे रोपे कणखर होऊन स्थलांतरानंतर दगावणार नाहीत. स्थलांतर करण्यापूर्वी २४ तास आधी वाफ्यांना पुरेसे पाणी द्यावे म्हणजे रोप उपटताना मुळाला फारशी इजा होणार नाही. रोपांचे स्थलांतर नेहमी संध्याकाळच्या वेळेस किंवा ढगाळ वातावरणात करावे. ■